# संजीवनी विद्यार्थि विमा पॉलिसी

## संजीवनी विद्यार्थि विमा पॉलिसी, प्रस्तावना

ही एक विमा पॉलिसी आहे की या योजनेअंतर्गत सहभागी विद्यार्थ्याच्या प्रस्तावामध्ये जाहीर केलेल्या पालकाचे (आई/वडिल/ कायदेशीर पालक) अपघाती निधन झालेस पैशाअभावी सदरच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षण वंचित राहू नये किंवा खंडीत होऊ नये व स्वाभिमानाने त्याचे शिक्षण पूर्ण व्हावे यासाठी संजीवनीने न्यू इंडिया अॅन्शुरन्स यांच्या माध्यमातून कमीत कमी विमा हप्यात ही योजना जाहीर केली आहे.

## वयोमर्यादा

१. महाविद्यालयामध्ये संजीवनी रुरलमध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांसाठी.
२. विद्यार्थ्यांच्या पालकाचे वय २५-८० वर्षे

## मेडिकल

अपघाताने /आजारपणामूळे हॉस्पिटलमध्ये दाखल झालेल्या विद्यार्थ्यास ५० हजारांपर्यंत हॉस्पिटलमध्ये उपचाराचा खर्च समाविष्ठ आहे.

अट :- १) किमान २४ तासांसाठी इस्पितळात भरती व्हावे लागल्यास विमा कंपनी उपचारासाठी झालेल्या खर्चाची परतफेड करेल. विमा योजनेतील नियम आणि अटी तसेच विमा संरक्षणाची रक्कम यांच्यानुसार सदर नुकसान भरपाई ठरविण्यात येईल.
२ ) सदर पॉलीसीमध्ये pre existing diseases समाविष्ट नाहीत

## पॉलिसी अंतर्गत मिळणारे लाभ

विद्यार्थ्याच्या पालकाचा अपघाताने मृत्यू झाल्यास खालील कोष्टकात रकाना ‘ब’ मध्ये दिलेली रक्कम भरपाई म्हणून मिळेल.
विद्यार्थ्याला अपघातात मृत्यू झाल्यास रकाना ‘क’ मध्ये दिलेली रक्कम मिळेल.

## या योजनेमध्ये समावेश नसलेल्या बाबी.

१. सध्याचे अपंगत्व
२. आत्महत्येचा प्रयत्न, आत्महत्या किंवा जाणून बुजुन स्वत:ला जखमी केल्यामुळे आलेला मृत्यू किंवा कायमचे अपंगत्व.
३. मादक पदार्थांचे सेवन करुन अपघात झाल्यामुळे किंवा वाईट हेतूने प्रेरित होऊन किंवा कायद्याने उल्लंघन करताना आलेला मृत्यू किंवा कायंमचे अपंगत्व.
४. शर्यत (रेसिंग), शिकार वेडसरपणा मुळे झालेला अपघाती मृत्यू/कायमचे अपंगत्व.
५. युध्द, दंगाधोपा, परकीय आक्रमण, अणूस्फोट, किरणोत्सर्ग मुळे आलेला मृत्यू किंवा कायमचे अपंगत्व.
६. नैसर्गिक मृत्यू (उदा. हार्ट अटॅक, ब्रेन हॅमरेज, मधुमेह, कावीळ व संसर्गजन्य रोग इ.)
७. परवाना नसणाऱ्या वाहनातून प्रवासी म्हणून प्रवास करताना आलेला मृत्यू.

## विम्याची मुदत, विमा रक्कम व एकाच वेळी भरावयाचा हप्ता खालील प्रमाणे.

| अ | ब | क | ड |
|---|---|---|---|
| अभ्यासक्रमाचे वर्ष | संजीवनी विद्यार्थी विमा पॉलिसी अंतर्गत विद्यार्थ्यास मिळणारा रक्कम | विद्यार्थी अपघात योजने अंतर्गत पालकास विद्यार्थ्यांस मिळणारी रक्कम | विम्याची मुदत |
| प्रथम वर्ष | रु. ४,००,०००/- | रु. १,००,०००/- | १ वर्ष |
| व्दितीय वर्ष | रु. ३,००,०००/- | रु. १,००,०००/- | १ वर्ष |
| तृतीय वर्ष | रु. २,००,०००/- | रु. १,००,०००/- | १ वर्ष |
| चतुर्थ वर्ष | रु. १,००,०००/- | रु. १,००,०००/- | १ वर्ष |